
# सत्याग्रही गांधीजी



पु. पां. गोखले

# सत्याग्रही गांधीजी

पु. पां गोखले

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

११०३

Satyagrahi Gandhiji (Marathi)

P. P. Gokhale

□

प्रकाशक
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३

□

© सर्व हक्क सुरक्षित

□

प्रकाशन दिनांक
५ डिसेंबर १९९८

□

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११०३०

□

**मूल्य : १५/- रुपये**

# सत्याग्रही गांधीजी

पोरबंदर संस्थानाचे पंचवीस वर्षे दिवाण होते श्री. करमचंद गांधी. त्यांचे चिरंजीव मोहनदास. हेच एकोणऐंशी वर्षांत (१८६९ ते १९४८) महात्मा गांधी ठरले. मोहनदास मॅट्रिक झाल्यावर बॅरिस्टर होऊन आले. मुंबई हायकोर्टात वकिली करू लागले. एका व्यापारी-कंपनीच्या खटल्यासाठी म्हणून हे बॅरिस्टर दक्षिण-आफ्रिकेत गेले.

तेथे खटला संपल्यावर त्यांनी पाहिले की, 'काला आदमी' म्हणून हिंदी माणसाला गोरे लोक हिडीसफिडीस करतात. माणुसकी म्हणून कशी ती नाही! कायदेही तसलेच. या गुलामीतून भारतीयांस सोडविण्यासाठी गांधीजींनी सात वर्षे सत्याग्रहाने तेथील सरकारशी लढा दिला. १९१४ मध्ये तो लढा यशस्वी करून गांधीजी हिंदुस्थानात आले.

चंपारण्यातील शेतकऱ्यांसाठी, अहमदाबादच्या मजुरांसाठी, खेडा जिल्ह्यातील दुष्काळपीडित किसानांसाठी मग गांधीजींनी सत्याग्रह केले व यशस्वी रीतीने त्यांची दुःखे निवारण केली.

लोक स्वराज्याची भाकर अपेक्षित होते. सरकारने जुलूमशाहीचा धोंडा घातला लोकांच्या पदरात. तेव्हा गांधीजींनी इंग्रज सरकारशी असहकाराचे युद्ध पुकारले. जे जे काही इंग्रजधार्जिणे त्याच्या त्याच्यावर बहिष्कार हे जनतेत ठरून गेले. लोक खुशाल तुरुंगाची शिक्षा गांधीजींच्या चळवळीसाठी भोगू लागले. स्वतः गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा झाली, पण त्यांच्या दुखण्यामुळे त्यांना सोडण्यात आले.

तेव्हा शिक्षेच्या मुदतीत गांधीजींनी राजकारण केले नाही, साध्या माणसासारखे राहून हिंदु-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता-निवारण, खादीप्रसार ही विधायक सेवाच गांधीजी करीत राहिले. दरम्यान भारताने 'वसाहती स्वराज्याची' एकमुखी सर्वपक्षीय मागणी केली होती. ती इंग्रजांनी फेटाळली. मग कॉंग्रेसने स्वातंत्र्य हेच आपले ध्येय निश्चित केले, त्यासाठी लढा द्यावयास गांधीजींनी अन्याय्य कायद्यांचा भंग करण्याची

चळवळ सुरू केली. मीठ, जंगल यांचे कायदे तोडले गेले. सरकारने मग गांधींशी तडजोड केली. ते दुसऱ्या गोलमेज परिषदेस १९३१ मध्ये विलायतेला गेले, पण स्वातंत्र्याबाबत ते तडजोड मानीनात! तेव्हा १९३२ साली फिरून चळवळ सुरू झाली. सरकारने जातीय निवाडा देऊन हरिजनांना हिंदूंतून फोडले. तेव्हा गांधीजींनी तुरुंगात उपास करून डॉ. आंबेडकर यांच्याशी समझोता केला.

दुसरे महायुद्ध ऊर्फ हिटलरी होरपळ सुरू झाली. तेव्हा अहिंसेचे पुरस्कर्ते गांधी यांनी युद्धविरोधाचा वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. तरीसुद्धा जेव्हा हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुटण्याचा रंग दिसेना, तेव्हा १९४२ साली महात्माजींनी 'चले जाव' ची चळवळ सुरू केली. या चळवळीमुळे आणि जागतिक युद्धामुळे इंग्लंड जिकीरीला आले. त्याने हिंदुस्थानातून आपला राजकीय गाशा गुंडाळला. १९४७ च्या १५ ऑगस्टला हिंदुस्थान स्वतंत्र झाला, पण त्यांतील बहुसंख्य मुसलमान असलेल्या भागाचे 'पाकिस्तान' नावाचे एक स्वतंत्र राष्ट्र झाले आणि बाकी हिंदुस्थान 'भारत' म्हणून स्वतंत्र राष्ट्र झाला.

या दोन भावांच्या वाटण्या होताना भारताने पाकिस्तानचे ५५ कोटी रुपये देणे निघाले. पाकिस्तानकडून पण काही येणे होते. आपण आपले कर्तव्य बजवावे, पाकिस्तानची कर्तव्यनिष्ठा पाकिस्तान पाहील, असा सल्ला महात्माजींनी दिला. तो खपला नाही एका तरुणाला. त्याने दिल्लीच्या एका प्रार्थनासभेत ३० जानेवारी १९४८ रोजी महात्माजींवर गोळी झाडली! तरीही "हे राम!" एवढेच म्हणून महात्माजी अनंतात विलीन झाले!!

अन्यायाची चीड, दीनदुबळ्यांच्या जीवनातील उणेपणा दूर करण्याची सेवा, स्वतःच्या सहनशक्तीने व सत्याग्रहाने माणुसकीचा धर्म स्थापण्याची खटपट, सर्वत्र समानता आणि "नम्र झाला भूता। तेणे कोंडिले अनंता।।" ही संतवृत्ती-हा महात्माजींचा आपणांस वारसा आहे.

*

# सत्याग्रही गांधीजी



## १. पावन ते कूळ

गुजरातचा एक भाग– काठेवाड. त्या काठेवाडात पोरबंदर हे संस्थान. त्याचे दिवाण– करमचंद गांधी. मोठा सचोटीचा माणूस. निर्लोभी तर कमालीचा. त्यांची घरधनीण सौ. पुतळाबाई. मोठी धार्मिक बरे. या दोघांच्या पोटी २ ऑक्टोबर १८६९ रोजी एक मुलगा जन्माला आला. त्याचे नाव आईने मोहनदास ठेवले. हाच मोहनदास पुढे भारताचा महात्मा झाला. गीतेने सांगितले आहे. (शुचीना श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभि जायते।) जे तप करताकरताच देह सोडतात किंवा तप करताकरताच चळतात, ते पावन आणि श्रीमान कुळात जन्माला येतात. मोहनदास करमचंद गांधी तसेच होते. मोहनदास म्हणजे 'हरि' चा भक्त.

*

## २. दाईचा धडा

मोहन गांधी वैष्णव. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' ही गांधी-घराण्याची चाल. मोहनचा सांभाळ एक दाई करी. रंभा तिचे नाव. "वैष्णवजन तो तेने कहिये, जो पर पीडाई जाने रे।" (जो दुसऱ्याचे दुःख जाणतो, त्यासि म्हणावे वैष्णव रे।) हे मोहनला रंभेने शिकविले. तिने मोहनला आणखी शिकविले की, तोंडाने 'राम राम' जो म्हणतो, त्याला जगात भय म्हणून कसे ते नाही!! मोहनने ती शिकवण चांगली गिरवली आणि "शान्त दान्त अससी मरणा। भीति तुझी वाटेना।।" असे म्हणण्याइतके आपले मन बळकट केले.

❋

## ३. शिक्षणासाठी परदेशी

मोहन शिकता शिकता झाला मॅट्रिक. आता तो कॉलेजात जाणार की नोकरी करणार? असा प्रश्न पडण्याचे कारण, मोहनचे लग्न वयाच्या चौदाव्या वर्षीच झाले होते. रीतच होती त्या वेळी तशी! त्याच्याच वयाची होती त्याची पत्नी. सरकारी नोकरीत आणि वकिलीत त्या काळी पैसा मिळे, मान होई व रुबाब मारता येई. तेव्हा गांधीघराण्याचे एक हितचिंतक म्हणाले, "घरी काही कमी नाही! तर आणा की हो मोहनला बॅरिस्टर करून!!"

सोपे का होते हे? विलायतेला जावे तेव्हा कुठे बॅरिस्टर व्हावे! अन् विलायतेला जायचे म्हणजे धर्मच सुटला, असे त्या काळी मानत! विलायतेला मुलगा गेला अन् साहेबाचे बघून मांस खायला लागला तर, दारू प्यायला लागला तर? पुतळाबाईंना तशी भीती वाटू लागली. अहो? आईचे हृदय ते. लोकांचे ऐकतो तेवढे पुरे की!!! आपल्या घरी तरी ती भुते नकोत, असे त्यांना वाटे. तेव्हा बापूंनी आईला शपथ दिली-"मी तसले पाप करणार नाही!" मग झाली आईची परवानगी. खर्चाला पैसा हवा, तर सौ. कस्तुरबा पुढे आली. तिने आपले दागिने काढून दिले. आपला नवरा बॅरिस्टर होणार, या मोठेपणाच्या गुदगुल्या तिच्या मनाला होत होत्या.

आपल्या घरात नवी आलेली आपली भावजय दागिने उतरून देते, मोहनच्या उच्च शिक्षणासाठी. हे पाहिल्यावर मोहनचे भाऊ लक्ष्मीदास यांनीही जरूर ते पैसे पाठविण्याचे कबूल केले. आणि? मोहनदास करमचंद गांधी इंग्लंडला गेले बॅरिस्टर होऊन यायचे म्हणून.

※

## ४. देश तसा वेश तर चालायचे बेश

अठरा वर्षांचे बापू इंग्लंडात गेले. तेथे त्यांना सगळेच जग नवीन वाटले. बॅरिस्टर व्हायला आपण आलो तर बावळट ठरता कामा नये, असा विचार आला. अन् काय? राहिले बाजूला आईला दिलेले वचन. सुरू झाले इंग्रजी चाळे. पोशाख झकपक, गाणेबजावणे तालासुरात, नाचसुद्धा ठेक्यात!!! बोलतानासुद्धा गांधी बायबली बोली बोलू लागले.

पण लवकरच बापूंचे मन त्यांना खाऊ लागले. ज्याला नाही अक्कल, त्याची घरोघरी नक्कल!! तसेच हेही खरे की "उसनी आणुनी ऐट चालता काय दिसे ध्यान?। तेथे अस्सल तेच प्रमाण।।" ही जाणीव झाली आणि बापूंनी आपली भारतीय राहणी सुरू केली ती जन्मभर पुरवली. हवामान, रीतिरिवाज आणि शिष्टाचार त्यांनी पोशाखापासून सगळ्या गोष्टींत सांभाळले, पण भारतीयत्वाची निशाणी राखून!

बापू आता आपली रसोई आपण पकवू लागले. पायी-पायी शिकवणीला जाऊ लागले आणि सवडी-सवडीने गीताही वाचू लागले. बायबलचाही त्यांनी अभ्यास केला. ते आता सत्याचा शोध घेऊ लागले.

एक दिवस एकवीस वर्षांच्या बापूंकडे एक मुलगी व एक बाई आल्या. "ही मुलगी तुम्हांला चांगली बायको शोभेल!" त्या बाई म्हणाल्या. ती मुलगीही बापूंच्याकडे तिरप्या नजरेने पाहू लागली. पण बापू सत्यप्रतिज्ञ हरिश्चंद्राच्या भारतातले. ते चटकन म्हणाले- "अहो, आईसाहेब, माझे तर लग्न झालेले आहे. तेव्हा मला लग्नाबाबत बोलावयाचेच नाही!" "अहो आश्चर्यम्-!" करीत गांधीजींच्या त्या भेटबहिणी मग परतल्याच की!!

※

## ५. रोजगाराची सुरुवात

तीन वर्षे इंग्लंडमध्ये राहून गांधीजी हिंदुस्थानात बॅरिस्टर होऊन आले. घरी येऊन पाहतात तो आपली आई कोठे आहे? इंग्लंडला जाण्यापूर्वीच वडील देवाघरी गेले होते; इंग्लंडमध्ये असताना आईही देवाघरी गेली. आपण उघडे पडलो असे आपणास वाटू नये अन् अभ्यास नीट व्हावा, म्हणून लक्ष्मीदासदादांनी आपणास काही कळविले नव्हते; हे बापूजींना कळून आले. वडील माणसांनी लहानांची मने अशी जपायची असतात तर! हा घेतला बोध बापूजींनी. पण म्हणून "आम्हांस नाही आई।" म्हणून होणारी अंतःकरणाची कालवाकालव थोडीच थांबणार?

विद्या झाली, ती आता अर्थकारी झाली पाहिजे. म्हणून बॅ. गांधी मुंबईला आले. पहिलाच खटला चालवायला न्यायमंदिरात उभे राहिले तो पाय लटपटायला लागले. पुढे तर आपल्या बंधूंनी पोरबंदरच्या महाराजांना 'नको तो सल्ला दिला' म्हणून बंधूंवरच इंग्रज सरकारने खटला भरला. तो ज्यांच्यापुढे चालावयाचा ते मोहनदास गांधींचे इंग्लंडमधील परिचित. म्हणून भावाचे वकीलपत्र घेऊन त्यांच्यापुढे गेले. तो "जे जे काहि जगी चकाकते दिसे ते सर्व सोने नसे!" असा सरळ अनुभव बापूजींना आला. लोकशाही इंग्लंडचा तो नागरिक परतंत्र हिंदुस्थानात सत्तेवर आला की झाला अरेराव अन् 'काला आदमी' म्हणून भारतीयांची आगळीक करू लागला! "अपमानशल्य ते विषसमचि जीवना!" झाले गांधीजींना.

इतक्यात एक योग आला. दक्षिण-आफ्रिकेत 'दादा अब्दुल्ला आणि कंपनी' नावाची एक गुजराती पेढी होती. या कंपनीचा एक सहा लाखांचा दावा मालकाच्या एका नातेवाईकावर होता. दोन्ही बाजूंना नाणावलेले वकील होते, पण हिशेबांच्या गुंतागुंती आणि मुकदम्याचे मर्म समजावून देणारा तेथे हवां होता. गांधींनी ते काम पत्करले व दक्षिण-आफ्रिका गाठली. तेथे गांधीजींना आपल्या 'काळ्या' वर्णाबद्दल गोऱ्या साहेबांकडून अपमान सहन करावा लागलाच. आगगाडीतील गांधीजींचे सामानच एकदा फेकून देऊन गोऱ्यांनी त्यांना खाली उतरविले; एकदा घोड्याच्या गाडीत बसून दिले नाही; एकदा तर गोऱ्या-साहेबाच्या

फाटकाजवळून बापू चालत गेले, म्हणून पहारेकऱ्याने धक्का मारला! "गोऱ्यांचिया किति कथू कुजक्या कु-लीला?"

पण गांधीजी काही काळ गप्प बसले. त्यांनी आधी हाती घेतलेले काम उरकले. वादी-प्रतिवादींची सन्मान्य तडजोड घडवून आणली. मग काय? "विंसरा म्हणुनी कसे विसरते प्रेमाचे नाते?"

एवढ्या आफ्रिकेत एक वादळ उठले. आफ्रिकेत राहणाऱ्या भारतीयांचा मतदानहक्क बुडविणारा कायदा करण्याचे दक्षिण-आफ्रिकेच्या सरकारने ठरविले. याविरुद्ध तेथील भारतीयांनी उठाव करण्याचे ठरविले. गांधीजींना त्यांनी पुढारी निवडले. गांधीजींनी वर्तमानपत्रांतून भारतीयांवर होणारा अन्याय स्पष्ट मांडला; होऊ घातलेला कायदा होऊ नये म्हणून अर्ज केले, करवले; पण सर्व पालथ्या घड्यावर पाणी झाले!!! तशी गांधीजींच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली!

दक्षिण-आफ्रिकेतील भारतीयांत व्यापारी होते, कारकून होते तसे मजूरही होते; अगदी वेठीचेही मजूर होते. भारत-सरकारने धाडले म्हणून त्यांतील कित्येक आफ्रिकेत गेले होते. तेव्हा त्यांच्या मतदानावर गदा हा ब्रिटिशांच्या भारत सरकारचा अपमान होता. गांधीजींनी भारतसरकारपुढेही तशी थाळी वाजविली, पण भारतसरकारचा कुंभकर्ण तशाने का जागा होणार होता?

*

## ६. अचूक चुकेना कोठे!

गांधीजी हरले, तसे गोरे शेफारले! म्हणून का गांधीजी रडले? छे, कशाला? ते डरलेच नाहीत. गोरे उधळले तसे गांधीही उसळले. एका वसाहतीतून भारतीयांना हाकलण्याचा कायदा झाला. दुसऱ्या वसाहतींनी भारतीय व्यापाऱ्यांविरुद्ध कडक नियम केले. एका वसाहतीने भारतीयांवर दर साल चाळीस रुपये डोईपट्टी बसविली. कोठे भारतीयांनी जमीन खरेदी करायची नाही, तर कोठे रात्री नऊ वाजल्यानंतर भारतीयांनी घराबाहेर पडावयाचे नाही अशी बंधने आली. 'नाताळ' या वसाहतीने तर ताळच सोडला आणि भारतीयाने साडेतीनशे रुपये डोईपट्टी भरली पाहिजे असा जुलूम केला. माणुसकी म्हणून कशी ती गोरे विसरून गेले.

एके दिवशी एक मजूर गांधीजींकडे आला. त्याला बदडला होता गोऱ्यांनी! त्याचे तोंड रक्तबंबाळ, दात पडलेले, पाहिले गांधीजींनी! आणि? त्यांच्यातला वैष्णवजन जागाच झाला. "जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।" असा अनुभव आला त्या मजुराला. त्याच्या मालकापासून त्याची सुटका झाली. मग गांधीजी म्हणजे मजुरांचे माहेरघरच झाले!

गोरे थेर करीत होते. त्यांना आवर घालण्यासाठी गांधीजींनी 'नाताळ भारतीय काँग्रेस' स्थापन केली. आणि? आपली मंडळी आफ्रिकेत घेऊन जाण्यासाठी हे हिंदुस्थानात आले. तीन वर्षांनी मायदेशाला आलेल्या बापूजींनी सहा महिने हिंडून भारतीय पुढाऱ्यांच्या कानावर दक्षिण-आफ्रिकेतला गोऱ्या बाळांचा धिंगाणा घातला. "भला रे भला, बोलती, ते करावे।" असा प्रतिसाद मिळाला. त्याचा प्रतिध्वनी दक्षिण-आफ्रिकेतही उठला. गांधीजी भारतीय मजुरांची झुंडच्या झुंड आणताहेत, अशी वदंता दक्षिण-आफ्रिकेत घुम् घुम् घुमली. मग काय विचारता?

गांधीजी आफ्रिकेत उतरले, की गोरे पाळतीवर होतेच! गाठले त्यांनी गांधींना रस्त्यात अन् काय? दिला बेदम मार. लोक म्हणाले, "गांधीजी, गुदरा त्यांच्यावर फिर्याद." पण गांधी म्हणाले, "जन खुळावले, सकळ उलट चालले! म्हणून का त्यांच्यावर फिर्याद करायची? बरोबरीच्यांशी किंवा जबरदस्तांशी भांडावे." विचारवंत लोक मग गांधीजींकडे जास्तच आदराने पाहू लागले.

भारतीय संस्कृतीची ठेवण अशी गांधीजींच्या प्रत्येक गोष्टीत दिसू लागली. ती कोठे चुकली, डोळ्यांआड झाली, असे झालेच नाही. तशातच आफ्रिकेत लढाई सुरू झाली. मग जखमी लोकांची सेवा करण्यासाठी गांधींनी भारतीयांचे एक सेवादल उभारले. त्या सेवादलाने केलेली सेवा पाहून लोक गांधींना "हरि हा ताप हरी।" मानू लागले.

मग गांधींना वाटले, जावे मायदेशाला. तेव्हा आफ्रिकेतल्या भारतीयांनी गांधीजींना जाहीर निरोप दिला. गांधीजींनी केलेली सेवा अमोल होती, म्हणून लोकांनी गांधीजींना तोलामोलाचे अलंकारही अर्पण केले. गांधीजींनी त्या अलंकारांना हातही लावला नाही. स्थानिक नेत्यांना ते म्हणाले - "हे सर्व इथल्या लोकांच्या सेवेला लावा. मला तुमच्या सदिच्छा मिळाल्या

आहेत. त्यांच्याइतका अमर आहेर दुसरा कोणता? हीच कृपा असो द्यावी."

बापूजी १९०१ च्या कलकत्ता काँग्रेसच्या वेळी भारतात आले. काँग्रेस मंडपाभोवतालची घाण त्यांना पाहवेना. त्यांनी झाडू घेतला आणि केली सेवा. अशी मुकी, पडद्यामागील सेवा हा त्यांचा स्वभावच.

※

## ७. पहिला सत्याग्रह



आता मुंबईला व्यवसाय करावयाचे गांधीजींनी ठरविले. काही जुळवाजुळवही झाली. तेवढ्यात आली तार दक्षिण-आफ्रिकेतून. तातडीचे बोलावणे होते ते!

इंग्लंडचे वसाहतमंत्री आफ्रिकेत येणार होते. त्यांच्या कानावर भारतीयांची गाऱ्हाणी घालावयाची होती. बापूजी आफ्रिकेत गेले. वसाहतमंत्र्यांना भेटले, पण वसाहतमंत्री म्हणाले, "आमचे कानी सात खडे, बहिरोबाच्या कानी आठ खडे!"

मग गांधीजींनी ठरविलेच की, आता भारतीयांच्या स्वाभिमानाचा

अन् माणुसकीचा प्रश्न धसाला लावायचाच! टाकीचे घाव सोसूनच देवपण येते. बापूजींनी आता एक साधकाश्रम काढला. 'भारतीय जनमत' या नावाने वर्तमानपत्र काढले. झुलू लोकांवर आफ्रिकन सरकार अत्याचार करू लागले तर झुलू जखमींची सेवा करण्यास गांधीजींचा साधकाश्रम बिनचूक पुढे झाला.

इकडे भारतात स्वराज्याची चतुःसूत्री बनारस काँग्रेसमध्ये मान्यता पावू लागली नि १९०६ साली कलकत्ता काँग्रेसने तर तिच्यावर राष्ट्रीय शिक्कामोर्तब केले. त्याच १९०६ साली तिकडे आफ्रिकेत ट्रान्सवॉल सरकारने भारतीयांना चांगलेच नामोहरम केले. त्याने एक कायदा केला. त्या कायद्याप्रमाणे स्त्री, पुरुष, मूल कोणी का भारतीय असेना त्याने आपल्या हातांचे ठसे देऊन सरकारात नाव नोंदवून घेतले पाहिजे असा दंडक केला. म्हणजे जगात भारतीय ही 'दुष्ट, चांडाळ, पापी, दरोडेखोरांची' जमात त्या सरकारने ठरविली. मग गांधीजींना कोठले गप्प बसवायला? त्यांनी त्या कायद्याविरुद्ध उठाव करण्याचे ठरविले. त्यांनी माणुसकीसाठी सत्याग्रह पुकारला. आपले नाव गांधीजींनी नोंदवले नाही म्हणून त्यांना दोन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली.

प्रल्हादाच्या निष्ठेने भारतीय शिक्षा भोगू लागले. तसा जनरल स्मट्स्ला थोडा हादरा बसला. ट्रान्सवॉलच्या सरकारात ते प्रमुख होते. त्यांनी गांधीजींशी सबुरीचे बोलणे केले. भारतीयांनी आपण होऊन नावे नोंदवून घ्यावीत; हातांच्या ठशांची जरूर नाही; सरकार नोंदणीचा कायदा रद्दबातल करील.

महिषासुरात माणुसकीला जाग आली, म्हणून गांधीजी तडजोडीला तयार झाले. ते आपले नाव नोंदवावयास जातात, तोच एका पठाणाने त्यांना झोडपलेच झोडपले! त्याला गांधीजी पडखाऊपणा करतात, असेच वाटले. म्हणून सरकारने त्याला शिक्षा केली, तरी गांधीजींनी त्याला सोडवून आणले.

पण भारतीयांचे असे संघटन झाले तर मग गोरे लोक राज्य कसे करणार? म्हणून स्मट्स् साहेबांनी आपले वचन ठेवले गुंडाळून! लोक तरी काय कमी होते! परत सत्याग्रह सुरू झाला. नोंदणीपत्रकेच एक दिवस जळली! लोकांनी तुरूंग भरले. शेवटी १९१४ साली सरकारने

भारतीयांविरुद्ध असलेले पुष्कळसे कायदे रद्द करून तडजोड केली. भारतीयांच्या सत्याग्रहाचा हा विजय होता. त्याला साकार व्हायला आणखी एक कारण होते. जर्मनीचा कैसर महायुद्धाचे रणकुंड शिलगाऊ पाहत होता. तेव्हा भारतीयांना आपल्या बाजूचे करून ठेवण्यासाठी ती इंग्रजांनी केलेली तडजोड होती. काही असले तरी सात वर्षांच्या सत्याग्रहाचे ते यश होते हे खचित.

❊

## ८. गुरु-भेट

दक्षिण-आफ्रिकेतील सत्याग्रहाला नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी साहाय्य केले होते. गोखले गांधीजींना गंगेसारखे निर्मळ दिसले. 'भारत सेवक समाज' स्थापणारे आणि गरिबांच्या दुःखनिवारणार्थ झटणारे गोखले गांधीजींना आपले गुरू वाटत. गांधीजी त्यांना महात्मा गोखलेच म्हणत. उलट, गांधीजींचा आफ्रिकेतील आश्रम आणि सत्याग्रह पाहून गोखले गांधीजींना संतच मानीत. "माझे गुरू न्या. रानडे किंवा राजा राममोहन राय यांची बरोबरी गांधी करू शकतील", असे नामदार म्हणत. गांधीजी हिंदुस्थानात परत आल्यावर गोखल्यांना भेटले. "भारत सेवक सामाजात यावे" अशी गांधीजींनी इच्छा प्रदर्शित केली. गोखले म्हणाले, "कोठे राहून लोकसेवा करायची हे ठरविण्यापूर्वी भारतीय जनतेत एक वर्ष मिळा-मिसळा." गांधीजींनी गुरूची आज्ञा पाळली.

❊

## ९. सत्याग्रहाश्रम

गांधीजी गुरुदेव टागोरांना भेटले, त्यांनी हरद्वारचा कुंभमेळा पाहिला, स्वामी श्रद्धानंदांची भेट घेतली, लोकमान्य टिळकप्रभृती थोर पुढाऱ्यांबरोबर विचारविनिमय करून आले. १९१५ साली १९ फेब्रुवारी रोजी गुरू गोखल्यांनी परलोक सुधारला, त्या वेळी त्यांचे दर्शन केले. आणि अहमदाबादला येऊन गांधीजींनी सत्याग्रहाश्रम सुरू केला साबरमतीच्या तीरी.

तो आश्रम स्वावलंबींचा होता. तेथे सेवायोगाची साधना होई. जात,

पंथ, धर्म, प्रांत असले कसलेही भेद तेथे नव्हते. भंगीकामासह सारी कामे साधकांनी करावयाची होती. स्वदेशी व स्वावलंबी वस्त्र साधकाने स्वतः सूत कातून तयार करावे लागे. या आश्रमाचा संचालक (१९१६) लखनौ काँग्रेसला गेला. दूर लांब उभा होता तो काँग्रेसच्या मुख्य व्यासपीठापासून. तरीही पं. जवाहरलालनी त्या सत्याग्रह्याला डोळे भरून पाहिले. दक्षिण आफ्रिकेच्या भारतीय लढ्याचे सेनानी म्हणून गांधीजींना सर्वांनीच धन्यवाद देऊन जवळ केले. १९०९ पासून काँग्रेसमध्ये गांधींची सत्याग्रह-गीता सांगणारे गोखले आता तेथे नव्हते. पण बॅ. जिनांशी करार करून हिंदु-मुसलमानांची एकदिल स्वराज्य-घोषणा घडविणारे लोकमान्य टिळक तेथे होते. त्या महापुरुषाला गांधीजींनी अभिवादन केले.

याच वेळी गांधीजींजवळ एक शेतकरी आला. चंपारण्यातील होता तो. तेथील गोरे मळेवाले शेतकऱ्यांना गुलामासारखे छळत. ती करुण कहाणी ऐकून गांधीजी चंपारण्याचा कानोसा घ्यावयास तिकडे गेले. छे! काय हे? गोऱ्या माणसांची काळ्या आदमीकडून चौकशी? ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही, त्या इंग्रजांशी जर्मन कैसर युद्ध करू लागला अन् तसाच दिमाख दाखवून गांधींसारखा काळा आदमी चंपारण्यात गोऱ्या मळेवाल्यांची चौकशी करणार? घडून द्यावयाचे नाही ते, असे इंग्रज सरकारने ठरविले. "आला तसे परत जा" असा गांधीजींना हुकूम झाला. गांधीजी म्हणाले, "मी परत जायला आलो नाही!" त्यावर सरकारी गोरे म्हणाले, "नाही ना तुम्हाला परत जायचे? मग बसा आता तुरुंगात!"

गांधीजी तुरुंगात गेले, पण ब्रिटिशांचे त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज गडबडले. कारण साबरमतीहून येणारे गांधीजींचे सत्याग्रही आणि दक्षिण-आफ्रिकेत सत्याग्रह यशस्वी करणारे गांधीजी यांचे तेज त्यांना ठाऊक होते. त्यांनी तुरुंग भरले तर युद्धप्रयत्न ढिले होतील, हे ते जाणत होते. आपल्या इंग्लंड-राष्ट्राविरुद्ध असले पातक घडून द्यावयास ते तयारच नव्हते. म्हणून चंपारण्यातील अधिकाऱ्यांच्या कानाला पीळ बसला. गांधीजी सुटले. गांधीजींची व त्यांच्या सत्याग्रह्यांची लोकसेवा तेथे सुरू झाली. सरकारनेही चौकशी करून कायदाच करून मळेवाल्यांचा

शेतकऱ्यांभोवतालचा सर्व करकोचा पार काढून टाकला. शेतकऱ्यांचा संयम, सत्याकरिता सहनशीलता आणि अहिंसेची शिस्त पाहून गांधीजींना देव पावल्याचा आनंद झाला.

*

## १०. तीन दिवसांत तडजोड

अहमदाबादला गिरण्यांतून धुसफूस सुरू झाली. मजुरांना पोट मारून काम करावे लागत होते. कैसरी कंदनाने केलेली महागाई सगळ्यांनाच नडत होती. मजुरांनी गांधीजींना सल्ला विचारला. गांधीजी म्हणाले, "मालकांनी अडवले तर अडवा त्यांना काम बंद करून!" तसा मजुरांनी केला संप. मालक बसले मूग गिळून. पगारवाढीचे तूप नाही, काम नाही म्हणून मजुरीचे तेल नाही. उपासमारीचे धुपाटणे मजुरांच्या कपाळी आले! तसा गांधीजींनी स्वतःच उपास केला. तेव्हा मजुरांना धीर आला. ते कचरत होते ते सावरले व संप चालू ठेवून आत्मक्लेशाला तयार झाले.

आणि गिरण्यांचे मालक-तेही वरमले. आपल्याच नोकरांना पोटाला भरपूर मिळावे, म्हणून आपण काळजी करणार नाही, तर कोण करणार? आणि आपण ती काळजी केली नाही, तर? आपल्या हटवादीपणाने गांधीजींसारख्या साधूचे प्राण धोक्यात घातल्याचे पातक आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाला लागणार? हा विचार गिरणीमालकांना सुचला मात्र, ते माणुसकीने तडजोडीला तयारच झाले. गांधीजींच्या तीन दिवसांच्या उपोषणाचे चीज झाले.

*

## ११. किसानांचा सत्याग्रह

खेडा जिल्ह्यात दुष्काळ पडला. शेतकरी हवालदिल झाला. त्याने सरकारकडे 'मायबाप!' म्हणून धाव घेतली. शेतसारा माफ व्हावा म्हणून मागणी केली. सरकारने कानात बोटे घातली. दुष्काळ पडल्याचे सरकार कबूलच करीना. गांधीजी सरकारकडे धावले. समजावण्याचा प्रयत्न केला. पण रामा, शिवा, गोविंदा! सरकारला घाम म्हणून फुटेना.

मग गांधीजींनी पटेलबंधूंची साथ घेतली. विठ्ठलभाई होते निष्णात वकील, वल्लभभाई होते 'नव्या युगातील नव्या दमाचा शूर शिपाई!' किसानांची संघटना सुरू झाली. त्यांनी शपथा घेतल्या. साराच देणार नाही; मग हालहाल होवोतो, नाही तर प्राणावर बेतो!'' गांधीजी खेडा जिल्हाभर हिंडले. त्यांनी किसानांना धीर दिला. ''इंग्रजांना तोंड देणे ते आपण न्यायनीतीने श्रेष्ठ ठरूनच दिले पाहिजे. हिरण्यकश्यपूचा छळ प्रल्हादाने सोसला, तसा आपण सोसू तर आपल्याही मदतीला देव येईल.'' गांधीजींच्या अशा समजावणीने राजकारणातला नवा सत्याग्रहाचा प्रयोग यशस्वी होऊ लागला.

शेवटी सरकार नमले. त्याने गांधीजींसारख्या लोकफकिराबरोबर समझोता केला आणि खेडा जिल्ह्यातील किसानांना सारासूट मिळाली.

✻

## १२. रंगरूट भरतीचा रंग

कैसरीकंदनात इंग्रजांना विजय मिळवायला हवा होता. त्यासाठी हिंदुस्थानातून रंगरूट पाहिजे होते. 'साम्राज्याच्या गरजा येती भारताच्या काजा' म्हणून लोकमान्य टिळकही सरकारच्या रंगरूट भरतीस मदत करायला तयार होते. प्रत्येक राष्ट्राला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे, असा इंग्रजांचा पुकार होता. सैन्यभरतीत भारतीय तरुणांनी आवडीने यावे म्हणून इंग्रजांनी 'भारतसंरक्षक सैन्य' म्हणून रंगरूटभरती चालविली होती. लोकमान्य टिळकांनी मंडालेहून १९१४ साली सुटून आल्यानंतर 'स्वराज्यसंघा'ची चळवळ चालवली होती. सरकारला नेमके तेवढेच नको होते. म्हणून युद्धपरिषदा ज्या वेळी १९१८ साली सरकारने घेतल्या त्या वेळी टिळकांना वगळून बाकी पुढाऱ्यांना सरकार बोलवी. दिल्लीच्या युद्धपरिषदेला गांधीजींना आमंत्रण होते, पण तेल्यातांबोळ्याचे पुढारी मानले गेलेले लोकमान्य टिळक ज्या परिषदेत नाहीत ती भारतीयांची प्रातिनिधीक परिषदच नव्हे, म्हणून गांधीजींनी दिल्लीच्या युद्धपरिषदेत रसच घेतला नाही. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. टिळकांना मुंबईच्या युद्धपरिषदेला आमंत्रण आले आणि त्या प्रांतिक परिषदेतून त्यांना 'न गणसि मज तूते तुच्छ मानून जातो' म्हणावे लागले.

✻


## १३. भाकरी नव्हे धोंडा

कैसरीकंदन १९१८ मध्ये थांबले. स्वयंनिर्णयाचा हक्क जर प्रत्येक राष्ट्राला आहे, तर हिंदुस्थानालाही आहे; म्हणून हिंदुस्थानात, बेझंटबाई अन् सारे राजकीय पक्ष आपापल्या परी चळवळ करीत होते. अमेरिकेत राहून पंजाबी शिखांनी 'गदर' चळवळ त्याचसाठी चालवली होती, सरकारनेही माँटेग्यू साहेबाकडून राजकीय सुधारणा हिंदुस्थानला देण्याचा देखावा केला होता. पण जर्मनयुद्धाच्या वेळी हिंदुस्थानने स्वराज्याची केलेली चळवळ म्हणजे इंग्रजांना आपली अडवणूक वाटत होती. म्हणून युद्ध थांबताच सरकारने लोकांना ताळ्यावर आणण्याचे ठरविले. सरकारचे शस्त्र चळवळ्यांच्या विरुद्ध 'रौलट ॲक्ट'च्या रूपाने फिरू लागले. संशयावरून वाटेल त्याला तुरुंगात अडकवून ठेवण्याचा अधिकार त्या कायद्याने पोलिसांना मिळाला होता. ते पाहून साबरमतीच्या तीरावरून गांधीजी म्हणाले, "मानवाची ही विटंबना आहे. साऱ्या राष्ट्राने निषेधास सज्ज व्हावे!"

राष्ट्र सज्ज झाले. सभा, हरताळ, प्रार्थना, निषेध होऊ लागले. हिंदुस्थानला हवी होती स्वराज्याची भाकरी; इंग्रजांनी पदरात बांधला रौलट ॲक्टचा धोंडा!! १९१९ च्या एप्रिलमध्ये दडपशाही शिगेला पोचली. दिल्लीला गोळीबार झाले. गुरख्यांच्या बंदुकीसमोर स्वामी श्रद्धानंद छाती उघडी करून 'चलाव तेरी गोली!' असे म्हणाले. पंजाबात जालियनवाला बागेत सभेला हजारो लोक जमले. त्यांच्यावर जनरल डायरने अमानुष गोळीबार केला. शेकडो मेले. लष्करी कायदा थैमान घालू लागला. दीड हजार माणसे जखमी झाली. मुलांना आणि स्त्रियांना फरपटावे लागले. वीस दिवसांत दडपशाहीने हे घातलेले थैमान पाहून, लोकांची सहनशक्ती आता शिगेला पोहोचली, असे गांधीजींच्या लक्षात आले. प्रक्षुब्ध जनता हिंसेकडे वळेल, म्हणून गांधीजींनी चळवळ थांबवली, पण जनतेतला असंतोष थोडाच संपणार?

❋

## १४. असहकार



जनतेचा असंतोष! त्याच्यावर नेत्यांनी उपाय योजावा लागतो. नाही तर त्याला वाट फुटेल तिकडे तो जातो; म्हणून गांधीजींनी त्यावर उपाय काढला तो स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश सरकारशी असहकार करण्याचा. लोकमान्यांच्या 'स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य' या चतुःसूत्रीचे विराट दर्शन ब्रिटिशांना आणि जगाला द्यावयाचे असे गांधीजींनी ठरविले; ते असहकाराची चळवळ उभारून. गांधींचा असहकार म्हणजे सतीचे वाण होते. त्याला महात्मा गांधी राष्ट्रपसंतीचा शिक्का घेऊ इच्छित होते. लोकमान्यांची नैतिक भूमिका त्यांना पुढे न्यावयाची होती.

दरम्यान १ ऑगस्टला (१९२०) लोकमान्य इहलोक सोडून गेले. महात्माजी म्हणाले, "आता एक क्षणभरही लोकमान्यांचे निशाण खाली ठेवता येणार नाही." त्यांनी पं. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, चित्तरंजन दास यांना आपल्या फळीत घेतले. सप्टेंबरमध्ये लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे खास अधिवेशन कलकत्ता येथे झाले.

त्यात असहकाराचा ठराव राष्ट्रसंमत झाला. जेथे १९०६ साली दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखाली स्वराज्याची चतुःसूत्री राष्ट्रमान्य झाली, तेथेच तिचा दंडकारण्यातील वनवास संपला! लोकव्यवहारात स्वातंत्र्याची चळवळ निर्भयपणे उमदी पावले टाकू लागली. शाळा, कॉलेजे, कोर्टे, कायदेमंडळे जे जे परकीय सत्ताधार्जिणे ते ते नकोच असे लोकांनी ठरविले.

मग काय सत्ताधारी सरकार हे सहन करील? टाकले त्यांनी बत्तीस हजार लोक तुरुंगात डांबून! तेथील रकट्याचे सुख अनेकांना भोगावे लागले, कित्येकांना फटके खावे लागले. आयुष्याचा क्षण नि क्षण व रक्ताचा कण नि कण देशाच्या चरणी तरुण-वृद्ध वाहू लागले. इंग्रज सरकार गोंधळले. त्याने चळवळ्यांना चवताळविले. बिहारमध्ये काही चळवळे त्यामुळे चेकाळले. त्यांनी चौरीचुरा येथील पोलिस चोकी जाळली.

अरेरे! अत्याचार घडला. चळवळीचे सत्त्व हरण झाले! म्हणून महात्माजींनी चळवळ मागे घेतली.

सरकार मग गांधीजींवर उलटले! महात्माजींच्या तीन लेखांचे निमित्त करून सरकारने महात्माजींवर खटला भरला! राजद्रोहाचा आरोप सरकारने महात्माजींवर व त्यांच्या पत्रांच्या प्रकाशकावर केला. दोघांनी मोकळ्या मनाने आपण गुन्हा केल्याचे कबूल केले. महात्माजी स्वच्छच म्हणाले, "सध्याच्या सरकारविरुद्ध अप्रीती निर्माण करणे हा माझा धर्म आहे. राजनिष्ठा कायदेशीर शिक्षेच्या भीतीने निर्माण करता येत नाही." महात्माजींना सरकारने सहा वर्षांची शिक्षा दिली. तेव्हा आभार मानून महात्माजी म्हणाले, "लोकमान्यांसारखे मला थोडे तरी करता आले."

※

## १५. "आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू!"

महात्मा गांधी तुरुंगात गेले, पण तेथे त्यांना आतडेदुखीचा त्रास होऊ लागला. त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली; पण त्यांच्या जीविताचे बरेवाईट झाले तर आपणाकडे दोष नको म्हणून सरकारने त्यांना १९२४ साली सोडले.

पण महात्माजींनी आपली नीती सोडली नाही. आपल्या शिक्षेची ठरलेली मुदत संपेपर्यंत त्यांनी राजकारण केले नाही. पांडवांचा अज्ञातवासच जणू!

त्या मुदतीत महात्माजी देशभर हिंडले; खादीप्रचार, अस्पृश्यतानिवारण, हिंदु-मुस्लिम ऐक्य, सर्वधर्मसमानता हे ते प्रचारीत. लोकशिक्षणासारखे साचार कार्य करणारा हा नवाच राष्ट्रदास विधायक कार्याने लोकसंघटना करीत राहिला.

※

## १६. श्रवण-निरीक्षण भक्ती

या काळात राष्ट्रात राजकीय घडामोडी पुष्कळच झाल्या. विठ्ठलभाई पटेल लोकसभेच्या अध्यक्षस्थानावर बसले. इंग्रज सरकारचा १९२५ चा अर्थसंकल्प लोकसभेने फेटाळला. हिंदुस्थानला स्वराज्य कसे हवे त्याची चौकशी करण्यासाठी सायमन कमिशन आले. त्याच्यावर राष्ट्राने बहिष्कार टाकला; बहिष्काराच्या त्या लढ्यात इंग्रज सरकारने केलेल्या लाठीमाराने लालाजी लजपतराय जखमी होऊन धारातीर्थी पडले. सगळ्या पक्षांनी एकमुखी स्वराज्याची तूर्त आणि ताबडतोब मागणी (पं. मोतीलाल) नेहरू रिपोर्टाने केली. तो रिपोर्ट इंग्रजांनी मानला नाही. म्हणून पंजाबात लाहोरला रावी नदीच्या काठी पं. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव केला व "शुरू हुआ है जंग हमारा!" म्हटले. महात्माजींनी हे ऐकले; पाहिले.

※

## १७. अगाध महिमा गांधीजींचा!

असायला काय हवे तेच विवेकशुद्ध असण्याबद्दल आग्रह धरणे आणि दुसऱ्याला ते पटेपर्यंत सोसायला लागले तर धैर्याने आणि शांततेने हाल सोसणे, हे महात्माजींच्या सत्याग्रहाचे स्वरूप; संत चोखामेळा यांनी म्हटल्याप्रमाणे :

*"समर्थे आपुल्या नामासी पहावे।*
*मनी उमजावे आपुलिया।।"*

म्हणून तो करावयाचा असतो. पण परसत्ता त्याबाबत निगरगट्ट झाल्याबरोबर महात्माजींनी त्याच सत्याग्रहाला असहकाराची जोड दिली. असहकारात राजद्रोहाबद्दल सहा वर्षांची स्वतःला शिक्षा झाली, ती महात्माजींनी आनंदाने स्वीकारली. त्यातून आजारीपणामुळे सुटका झाली तर, नैतिक जबाबदारी सांभाळण्यासाठी महात्माजींनी राजकीय अज्ञातवास पत्करला. त्या अज्ञातवासातही त्यांचा राष्ट्रसेवायोग चालूच होता. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर, नव्हे होतानाही अंतर्गत दुबळा राहू नये, हा त्यांच्या विधायक चळवळीचा कटाक्ष होता. बंकिमचंद्रांच्या 'आनंदमठ' कादंबरीपासून व विशेषतः महात्माजींचे गुरू नामदार गोखले यांच्या भारत सेवक समाजाच्या स्थापनेपासूनच तो सेवायोग जोर धरू लागला होता. त्याला महात्माजींनी आगळे साकार केले.

पण तेवढ्याने पारतंत्र्य कसे जाणार? राजकीय अज्ञातवासात ऐकलेल्या व पाहिलेल्या गोष्टींनी राष्ट्र स्वातंत्र्यप्राप्तीची प्रतिज्ञा करून बसलेले गांधीजींनी पाहिलेले होते. त्या राष्ट्राला स्वातंत्र्याच्या वाटेवर व्यवहारतः नेताना, राष्ट्राचा आत्मविश्वास वाढविणारी चळवळ काढावयाची जबाबदारी नेत्यांची होती. आपला अज्ञातवास संपविताना उत्तर-गोग्रहणप्रसंगी अर्जुनाने शमीच्या झाडावर ठेवलेली आपली शस्त्रे परजली. गोलमेज परिषदा भरवून राजकीय सुधारणांच्या तुकडेवाटपाने इंग्रज भारताच्या स्वातंत्र्यध्येयाचे अब्रूहरण करू पाहत होता. त्याला उत्तरी प्रतिकार म्हणून, आपला राजकीय अज्ञातवास संपविताना आपल्या मेंदूच्या शमीवरून एक साधे शस्त्र परजले. त्याचे नाव कॉंग्रेसची स्वातंत्र्य-प्रतिज्ञा. २६ जानेवारी १९३० रोजी खेड्यापाड्यांतसुद्धा हिंदुस्थानातील आम जनतेच्या जाहीर सभांतून या स्वातंत्र्यप्रतिज्ञेचे निर्भय वाचन झाले. त्यामुळे लोकांच्या मानसिक तयारीचा अंदाज राष्ट्रीय नेत्यांना आणि सत्ताधाऱ्यांनाही आला.

*

## १८. मीठ-जंगल-सत्याग्रह

लोकमताचा अंदाज आला. मग गांधी दांडीयात्रेला निघाले. हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत साबरमतीच्या सत्याग्रह-आश्रमात येणार नाही, असे त्यांनी जाहीर केले. भारतात मीठ समुद्रकिनाऱ्यावर तयार होते; काही

ठिकाणी किनाऱ्यावर ते तयार सापडते. या मिठावर जबरदस्त सरकारी कर होता. जबरदस्त कराचा मीठ-कायदा म्हणजे गरीबगुरीब जनतेवर सरळ अन्याय होता. अशाच अन्यायाच्या कायद्यामुळे फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली होती. तो इतिहास जगाच्या व इंग्रजांच्या परिचयाचा होता. म्हणून हिंदुस्थानातील मिठाचा अन्यायी कायदा दांडीला महात्माजी आपल्या अनुयायांसह जाऊन तोडणार होते. चोवीस दिवसांत दोनशे मैलांची वाटचाल करून गांधीजींचे हे बंड होणार होते.

या बंडाला भारतीय लोकमत जोरजोरात साथ देऊ लागले. गांधीजी वाटेवरील गावागावांतून विधायक राष्ट्र-सेवेचा लोकजागर करीतच होते. दांडीमोर्चा तिकडे चालू असताना देशाच्या अन्य भागांतूनही मिठाचा अन्याय्य-कायदेभंग करण्यासाठी लोक व्यूह आणि चक्रव्यूह रचत होतेच. दांडीला महात्माजींनी परमेश्वराची प्रार्थना करून पवित्र झालेल्या मनाने मिठाचा इंग्रजी कायदा मोडला!!! मग काय? ती चळवळ सर्वत्रच उसळली.

एकदा चळवळ सुरू केल्यावर, शेंडी तुटो नाही तर पारंबी तुटो, ती शेवटास न्यावयास हवी. मिठाचा कायदेभंग झाला! पण पावसाळा सुरू झाला की तो कायदेभंग करावयाचा कसा? म्हणून लोकनायक बापूजी अणे यांनी जंगल-सत्याग्रहाची कल्पना काढली. तीही लोकांनी उचलून धरली. इतकी की अन्यायी कायदा भारतीय जीवनात ठेवावयाचाच नाही, असाच जणू लोकांचा निश्चय दिसला!!

## १९. गांधी-आयर्विन करार

महात्मा गांधींपासून गावोगावी सगळेच कायदेभंग करू लागल्याने "शुरू हुवा है जंग हमारा" हे लाहोर काँग्रेसचे फर्मान खरे ठरले. कायदेभंग करणाऱ्या सत्याग्रहींनी हिंदुस्थानातील तुरुंग इंग्रजांनी भरून काढले. त्याचबरोबर इंग्लंडमध्ये गोलमेज परिषद भरवून, हिंदुस्थानला आपण स्वराज्य द्यावयास काढले आहे, असेही नाटक इंग्रजी राज्यकर्त्यांनी चालविले होते. पण;

*फुलांचे अंगा सुवास असे। फूल वाळलिया सुवास नासे।।१।।*

*मृत्तिकेचे घट केले नानापरी। नाव ठेविले रांजण, माथण, घागरी॥२॥*
*विराली मृत्तिका, फुटले घट। प्राणी का फुकट शोक करी॥३॥*
*चोखा म्हणे ऐसे मृगजळ पाही॥ विवेकी तये ठायी न गुंतेचि॥४॥*

अशी होती त्या गोलमेज परिषदेची जगात प्रतिष्ठा. तेव्हा मग, आपली नाटकीच असली तरी अब्रू सांभाळण्यासाठी, इंग्रज सरकारने काँग्रेसशी समझोता करण्याचा निर्णय घेतला. डॉ. सप्रू आणि डॉ. जयकर यांना मध्यस्थ करून बोलणी सुरू झाली. शेवटी इंग्रज सरकारचे प्रतिनिधी लॉर्ड आयर्विन इंग्लंडच्या मंत्रिमंडळाचा सल्ला घेत घेत बोलत होते. महात्मा गांधीही काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष लोकनायक अणे व कार्यकारी मंडळ यांना विचारून बोलणे करीत होते. त्यातून तयार झाला गांधी-आयर्विन करार :

१. काँग्रेसने कायदेभंगाची चळवळ थांबवावी.
२. राजकीय कैदी सरकारने सोडून द्यावेत.
३. समुद्रकिनाऱ्यावर लोकांनी मीठ करण्यास हरकत नाही.
४. काँग्रेसने १९३१ च्या गोलमेज परिषदेत भाग घ्यावा.

भारतीय जनतेशी समान पातळीवर झालेली ही पहिलीच तडजोड. ही हिंदुस्थानची स्वातंत्र्याकडे ठाम पाऊलवाट ठरली.

या तडजोडीप्रमाणे काँग्रेसचे एकच एक प्रतिनिधी म्हणून, मग महात्माजी दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर राहिले.

※

## २०. बरे आहे; पाहून घेता

महात्माजी लंडनला गेले. इंग्रजी जनतेने त्यांचे स्वागत केले. गोलमेज परिषदेला आलेला हा सरकारी पाहुणा राहिला गोरगरिबांच्या वस्तीत. त्यांची भेट अनेकांनी घेतली, त्यांनीही अनेकानेक भाषणे केली. बापूजी तेथे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याशिवाय काही बोलतच नव्हते. बोलणेही शक्य नव्हते. स्वातंत्र्याची कोठे तडजोड असते काय? हिंदुस्थानने स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेतली होती ना? आता तुकडेपट्टीच्या राजकीय सुधारणा घेणे म्हणजे तपश्चर्येला बसल्यावरही दुष्काळाचे निमित्त सांगून हाडे चघळणे होते. ते करायला कोण तयार होणार? महात्माजी? नाव

कशाला? हां! एक तडजोड मात्र होती मान्य. कोणती? हिंदुस्थान स्वतंत्र झाला तरी इंग्लंडचा स्नेह सोडणार नाही. कारण त्याचा प्राचीनतम धर्मच मुळी विश्वधर्म आहे. "कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर-पूजनाचे॥" असे शिकविणारा तो धर्म आहे. त्याला अनुसरूनच स्वतंत्र हिंदुस्थानचा प्रत्येक नागरिक हेच म्हणत राहील की–

*"सर्वांसी विश्रांती तेथे मन ठेवी।*
*ते सुख शांती देई देवा मज॥१॥*
*सर्वांभूती दया, संतांची ते सेवा।*
*हेचि देई देवा, दुजे नको॥२॥*

चोखामेळ्याने प्रकट केलेल्या या सदिच्छेशिवाय, दुसरी तडजोड म्हणजे स्वातंत्र्याच्या शुद्ध कल्पनेला तडा पाडणे होय.

पण महात्माजींचा हा दिल समजावयाला जनताजनार्दन तयार होता; तसे गोलमेज परिषदेत बसणारे कोण होते?

गोलमेज परिषदेत एकशेबारा महाशय होते. त्यात वीस होते इंग्रज सरकारचे; तेवीस होते राजेरजवाडे; बाकीचे होते 'तो मान मी मिळविला!' एवढ्याच समाधानाचे. स्वातंत्र्याची तहान हे 'देणे ईश्वराचे' त्यापैकी कोणाला? असते तर त्याचे जीवन उजळूनच निघते! तसे तर तेथे काहीच नव्हते. ती गोलमेज परिषद रंगीबेरंगी मात्र होती. जनतेच्या स्वातंत्र्याचे उपासक गांधीजी. त्यांनी त्या विविधतेचा चांगलाच फायदा घेतला. हिंदुस्थानातील दरिद्री-नारायणांचा हा प्रतिनिधी अक्षरशः 'नंगा फकीर'- पोशाखाने त्या परिषदेत बसला. आणि? इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानातील चाळीस कोटी जनता कंगालीच्या पराकोटीला कशी गेली आहे हे गांधीजींनी त्या परिषदेत सांगितले. आता स्वातंत्र्याशिवाय दुसऱ्या कशानेही हिंदुस्थानचे समाधान होणार नाही, हेही गांधीजींनी स्पष्ट केले!

आपला कैवारी देवदूतच गांधीजींच्या रूपाने भेटला, असे समाधान हिंदुस्थानातील जनता मानू लागली. पण, अरे बापरे!!! त्यानेच इंग्रजी साम्राज्याचे बरकंदाज भांबावले. त्यांना असे वाटले की इंग्रजी रियासतीची बेअब्रूच झाली! जगातील वृत्तपत्रांचे बातमीदार तेथे होते ना? त्यांनी गांधीजींचे भाषण प्रसिद्ध केले! अन्? ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत

नाही, त्या साम्राज्यातला काळेकुट्टपणा जगापुढे आला!!! त्याने तडफड झाली साऱ्या सत्ताधाऱ्यांची. करायला गेलो एक अन् झाले भलतेच, असे त्यांना झाले!!! ते मनात म्हणाले--"बरे आहे बच्चंजी, पाहून घेतो."

*

## २१. त्यांचे वर्म जाणे तुका



महात्माजी हिंदुस्थानला परत यावयास निघाले. बोटीवर त्यांना कोणी विचारले, "जर आपल्याला स्वातंत्र्याशिवाय काही मागावयाचेच नव्हते, तर आपण गोलमेज परिषदेत आला तरी कशाला?"

गांधीजी उत्तरले की, "मैं तो बनिया हूँ! कैसी चीज की कैसी किफायत करना यह हमारी दिल की बात है।"

महात्माजींच्या या चतुर उत्तरात "व्यर्थी अधिकचि अर्थ असे, तो ज्यास दिसे तो चतुर असे॥" गांधीजी आपण होऊन गोलमेज परिषदेला आलेले नव्हते. काँग्रेसने एकदा स्वातंत्र्याचा पुकारा केल्यानंतर तिने गोलमेज परिषदेवर बहिष्कारच टाकला होता. अन्यायी कायद्यांचा भंग

करून राष्ट्र स्वातंत्र्याची वाटचाल करू लागले होते. अशा वेळी आपली गोलमेज परिषद सर्वांगीण प्रातिनिधीक नाही, याची खंत इंग्रजांना वाटत होती. तेवढ्यासाठी गांधी-आयर्विन करार करून त्यांनी गांधीजींना गोलमेजास नेले. तेथे येऊन आपले म्हणणे मांडा असे इंग्रजांचे आर्जव होते. काशीला जाऊन, आपला स्वप्नात दिलेला शब्द खरा करू पाहणाऱ्या हरिश्चंद्राची विश्वामित्राने वाटेवर घेतलेली ती सत्त्वपरीक्षा होती. हे का गांधीजी जाणत नव्हते? माणुसकी राखण्यासाठी, माणुसकीच्या शब्दाला प्रतिसाद देण्यासाठी ते हिंदुस्थानतर्फे गोलमेजास गेले. गोलमेजाच्या अन्नछत्रात त्यांनी मिरपूड मागितली नाही. इच्छाभोजन मागितले? ते द्यायची इच्छा दिमाखदारांना सत्तालोभ सुटल्याशिवाय कशी होणे शक्य हे जाणून होते गांधीजी. आपल्या गोलमेजातील भाषणाचा परिणाम काय, हेही ते जाणून होते. "गाठ पडली ठका। त्याचे वर्म जाणे तुका।" म्हणूनच बोटीवरील प्रश्नाची त्यांनी बोळवण केली मोघम उत्तराने! नाही का?

गांधीजी हिंदुस्थानात आले. ज्यांनी त्यांना गोलमेज परिषदेला इतमामाने पाठविले त्याच लॉर्ड विलिंग्डन या व्हाइसरॉयनी त्यांना बोटीवरून उतरताच १९३२ च्या जानेवारीच्या प्रारंभी कैदखाना दाखविला.

※

## २२. ऐतिहासिक मलमपट्टी

गोलमेज परिषदेतून हिंदुस्थानला आपण भरपूर राजकीय सुधारणा देत आहोत, हे इंग्रजांचे तुणतुणे चालूच होते. त्याचाच आवाज तेवढा जगाने ऐकत राहावा, म्हणून स्वातंत्र्याच्या चाहत्या व्यक्तींना आणि संस्थाना हिंदुस्थानात टाळेबंदी झाली. जे मोकळे राहिलेसे वाटले, त्यांना पोलिसठाण्यावर हजेरी देण्यापासून गुन्हेगार जमातीसारखी बंधने आली. 'असुनि खास मालक घरचा, म्हणति चोर त्याला।' असा परवशतेचा पाश भारतीय जनतेला अनुभव देऊ लागला.

आणखी जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार घडला. १९११ साली ज्या रॅम्से मॅक्डोनाल्ड या मजूर-पुढाऱ्याला काँग्रेसने आपला अध्यक्ष निवडले होते व जो त्या वेळेस येऊच शकला नाही, त्याच रॅम्से

मॅक्डोनाल्ड या ब्रिटिश मंत्र्याने आपला एक 'जाति-निवाडा' १९३२ साली जाहीर केला. तो इंग्रजांच्या 'फोडा, आणि झोडा व राज्याचा गाडा ओढा' या राजनीतीला धरून होता. १८८९ पासून प्रयत्न कर-करून १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणांच्या निमित्ते जसे हिंदूंपासून मुसलमान इंग्रजांनी फोडले, तसेच आता हिंदूंपासून हरिजन अलग करण्याचा डाव मॅक्डोनाल्ड निर्णयाने टाकला.

या निर्णयाने गांधीजींसह सर्व विचारवंत हळहळले, पण तळमळून प्रयत्न करावयाचा तो निर्णय बदलून घेण्यासाठी, असे महात्माजींनी ठरविले. त्यांनी आपला 'निर्वाणीचा एक पांडुरंग' तुरुंगवासातही उभा केला. येरवड्यात ते उपासास बसले.

देश हादरला. हरिजनांना मंदिरप्रवेशापासून हवे होते ते सर्व हक्क जनताच देऊ लागली. हरिजन-पुढाऱ्यांची जनतेने आर्जवे केली. गांधीजींच्या प्राणाबद्दल जनतेची चिंताच तेवढी त्या वेळच्या समाजमनात होती. 'अस्पृश्यतानिवारण होईल तर एक वर्षात स्वराज्य' असे गांधीजी त्या वेळी म्हणत, त्यातील राष्ट्रसंघटनेचे काव्य लोकांच्या लक्षात येऊ लागले होते. भारतीय दलित समाज हा दुबळा दुवा डिवचला होता. जातीय निर्णयाने!!! तो तुटून पडू नये म्हणून गांधीजींसह सर्व सुधारकांची खटपट होती; प्राणांतिक उपास तेवढ्यासाठी आरंभून महात्माजी ऐतिहासिक कार्य करीत आहेत याबद्दल जनतेची बालंबाल खात्री पटली होती. म्हणूनच जनतेने भराभर पावले टाकली. डॉ. आंबेडकर गांधीजींशी येरवड्यात जाऊन बोलले. त्या दोघांच्या वाटाघाटीतून एक करार बाहेर आला. हरिजनांचे स्वयंतंत्र स्वतंत्र मताने पसंत झालेल्या उमेदवारांपैकीच मुख्य निवडणुकीत सार्वत्रिक मतदानाने कोणी तरी लोक-प्रतिनिधी ठरवायचा, असा होता आशय त्या कराराचा. अस्पृश्यतेच्या चिघळलेल्या जखमेवर ती राजकीय मलमपट्टी होती.

ती इंग्रजी-सरकारनेही पत्करली. कारण त्यात मॅक्डोनाल्ड निर्णयाचे बियाणे जीव धरून होते. गांधीजींना ते डाचत होते, पण आपण मरून गेलो तरी अस्पृश्यतेची झाडंपट्टी झाल्याशिवाय खरा तरणोपाय नाही, हे ते जाणत होते. हरिजनांचा उद्धार करण्याचे ऋण जाणकार समाजावर आहे, ते त्यांनी फेडलेच पाहिजे, हे गांधीजींनी राष्ट्रापुढे स्पष्ट केले.

हरिजनांचा अस्पृश्यतेने झालेला कमकुवत दुवा बलवान करणे हे विचारवंतांचे कर्तव्य आहे; ही जाणीव देऊन स्वतः गांधीजींनी त्या कार्यास बहुतांशाने वाहून घेण्याचे ठरविले.

*

## २३. स्वाभिमानसंरक्षणार्थ सत्याग्रह

गांधीजी तुरुंगातून सुटले आणि तीन वर्षांनी फिरून साऱ्या हिंदुस्थानभर त्यांनी हरिजनसेवेचा प्रचार केला. आता ते वर्धा येथे आश्रम स्थापून काम करू लागले. आपले हरिजनसेवेचे, खादीप्रसाराचे, रुग्णशुश्रुषेचे सेवाव्रत ते चालवू लागले. राजकारण त्यांनी जनतेच्या तरुण नेत्याकडे सोपवून "गोष्टी सांगेन युक्तिच्या चार।" एवढीच भूमिका आपल्याकडे ठेवली

या सुमारास जर्मनीचा हिटलर नवे महायुद्ध शिलगावू लागला होता. ते धुमसले व पेटले तर रणांगणावर रंगरूट आपल्याला हिंदुस्थानात मिळायला पाहिजे, ही खूणगाठ इंग्रजांच्या मनात होतीच. त्यासाठी हिंदुस्थानात शांतता हवी म्हणून गोलमेज परिषदांची सांगता म्हणून "१९३५ च्या नवीन राजकीय सुधारणा" हिंदुस्थानाला बहाल केल्या. आपल्या अर्थकारणाचे स्वातंत्र्य आपल्या हाती असणे, हेच कोणत्याही राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे मुख्य सूत्र विज्ञानमय यंत्रयुगात तरी आहे. तेवढेच हिंदुस्थानला न देता, आलेल्या राजकीय सुधारणा म्हणजे १९३५ च्या सुधारणा! त्याने नामधारी प्रांतिक स्वराज्य होते. "उपर की तो बहोत बनी, अंदरकी बात हिंदुस्थान जाने।" म्हणून त्याच्यावर निराशाजनक म्हणून शेरा मारण्यात आला.

पण त्या सुधारणा राबवून मोडावयाच्या आणि स्वातंत्र्याचा रस्ता मोकळा करावयाचा असे नवीन नेत्यांनी ठरविले. १९३७ पासून आठ प्रांतांत कॉंग्रेसमंत्रिमंडळांचे व इतरांत इतरपक्षीय मंत्रिमंडळांचे कारभार सुरू झाले. मग भारतीय संस्थानिकांचे प्रजाजनही तसल्याच कारभारीपणाची आकांक्षा बाळगू लागले.

एवढ्यात हिटलरने शिलगावलेल्या युद्धाची होरपळ १९३९ साली सुरू झाली. इंग्रज साम्राज्याने हिंदुस्थानला देखील युद्धमान राष्ट्र म्हणून

जाहीर केले. हिंदुस्थानातील नामधारी लोकशाहीचा सुद्धा हा अवमान होता. हिंदुस्थानला मतस्वातंत्र्य सुद्धा नाही याचा हा पुरावा होता. १९२७ साली लोकशाही स्वराज्याची सावलीसुद्धा नसताना, सायमन कमिशनवर एकही हिंदी मनुष्य घेतला नाही म्हणून त्याच्यावर सगळ्या राष्ट्राने बहिष्कार घातला होता. मग आता खुशाल इंग्लंडने हिंदुस्थानला युद्धमान म्हणून पुकारावयाचे आणि मुकाट्याने इंग्लंडचे आज्ञाधारक राष्ट्र म्हणून ते खपवून घ्यावयाचे, तर राष्ट्राने केलेल्या स्वातंत्र्याच्या ठरावाचा अर्थ तरी काय? कैसरीकंदना (१९१४-१८) च्या वेळीच संरक्षण आणि स्वराज्य ही हातात हात घालून चालणारी आहेत, असे लोकमान्यांनी राष्ट्राला शिकविले होते. ते नामधारी स्वराज्याचा देखावा झाल्यावर राष्ट्राने विसरून जाण्यासाठी काय? म्हणून, इंग्रजी साम्राज्याने भारतीय लोकमताला विश्वासात घेतले नाही, हे लक्षात ठेवून, स्वाभिमान-संरक्षणासाठी आणि असहकारापासून स्वातंत्र्यसंपादनाच्या ध्येयापर्यंत आपण ज्या अहिंसातत्त्वाने पुढे झालो, त्यास अनुसरून आपले धोरण आखावयास हवे, असे राष्ट्रीय नेत्यांचे मत झाले. महात्माजींचा सल्ला त्यांनी घेतला.

महात्माजी म्हणाले, "गेल्या शतकाअखेर ज्या लढाया झाल्या, त्यांत माणसाच्या शौर्याला वाव होता. आमने सामने लढाई होई. सेनापती रणांगणावर सैनिकांच्या बरोबर राही, पण आजकालचे युद्ध अजबच अजब. विमाने फिरवून त्यातून टाकलेल्या दारू-गोळ्याने विरोधी राष्ट्रातील निष्पाप जनतेचा खाटिकखानाही एखाद्या राष्ट्राला उभारता येईल!! काँग्रेस प्रथमपासूनच लोकशाहीवादी आहे. तिने कधीही जर्मनी, इटली, जपानसारख्या हुकूमशाही राष्ट्रांच्या धोरणाचा पाठपुरावा केला नाही, नवीन हिटलरी होरपळीतही काँग्रेसची व हिंदुस्थानची सहानुभूती इंग्लंड-अमेरिकेच्या लोकशाही धोरणासच राहील, पण हिंदुस्थानच्या सहानुभूतीची पर्वा इंग्लंडला आहे कोठे? इंग्लंडने हिंदुस्थानला युद्धमान म्हणून जाहीर करून हुकूमशाहीच गाजविली आहे. तरीही इंग्लंडच्या युद्धप्रयत्नात काँग्रेस व राष्ट्रीय हिंदुस्थान खोडा घालणार नाही, अडथळा करणार नाही, आडवे येणार नाहीत; त्याचबरोबर भारतीय मन गुलामाप्रमाणे युद्धाला जुंपावयाचे नाही, म्हणून युद्धविरोधाचा

वैयक्तिक सत्याग्रह सुरू करू या.''

यानंतर काँग्रेसने महात्माजींना वैयक्तिक युद्धविरोधसत्याग्रहाचे सर्वाधिकार दिले. या अधिकारांचा उपयोग करताना, ज्यांच्या शीलवंत चारित्र्यामुळे युद्धविरोधाच्या सत्याग्रहाला जगात मोजले जाईल, असे संत विनोबाजी भावे यांची योजना पहिले सत्याग्रही म्हणून केली आणि त्यांच्या पाठोपाठ पंडित जवाहरलालजी नेहरू!! त्यामुळे, त्या मर्यादित सत्याग्रहालाही अमर्याद वजन येत गेले.

*

## २४. बाळा, जाई परतोनी!

हिटलरी होरपळीत एका बाजूने जर्मनी-इटालीची झडप व दुसऱ्या बाजूने जपानची चिमट, या योगाने दोन वर्षांत इग्लंड चांगलेच दामटले गेले. अमेरिकेने इंग्लंडला हाती धरले नसते, तर इंग्लंडची दामटीच वळली असती!! त्या अमेरिकेच्या सूचनेवरून इंग्लंडने हिंदुस्थानची सहानुभूती साकार करण्याकरिता क्रिप्स नावाचा हुशार मध्यस्थ धाडला. ती सारी बनवाबनवी होती, हे न ओळखण्याइतका का हिंदुस्थान १९४२ च्या आरंभाला अडाणी राहिला होता? का, ''ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे वाजू देण्यासाठी मी काही पंतप्रधान झालो नाही.'' हे चर्चिलसारख्या मुरब्बी इंग्रज मुख्यमंत्र्याचे शब्द हिंदुस्थानच्या लक्षात नव्हते?

म्हणून क्रिप्ससाहेबांची शिष्टाई म्हणजे पूतनेचे दुग्धपान मानले हिंदुस्थानच्या राष्ट्रीयांनी. मोहनदास गांधींनी तर महात्म्याला साजेशा गोडीने सांगितले– ''बाळा, जाई परतोनी!''

पण एवढ्याने हिंदुस्थानच्या जीवनातील राजकीय पोकळी थोडीच भरून निघणार होती? जपानचा जोर वाढत होता. नोटांची भेंडोळी पेरून हिंदुस्थानच्या जनतेला इंग्रज सरकार फुकट राबवत होते. युद्धकालीन कडक कायदेबाजीमुळे कोणी फारसे बोलत नव्हते. एव्हाना अशी एक अफवाही उठली की जपानी सैन्य हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरणार आणि मग नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीयांना 'चलो दिल्ली' असे आवाहन करीत दिल्ली गाठणार!! या वेळी ''दिल्ली तो बहोत दूर नव्हे नुसती दूर'' ठेवून चालणार नाही, असा जनता

निर्णय घेईल की गोंधळून जाईल? तिला योग्य नेतृत्व द्यायला नको काय?

*

## २५. सावधान ! सावधान!!

महात्माजींनी व पुढाऱ्यांनी खूप विचार केला. नेताजी सुभाषचंद्रच जपानी सैन्याचे मार्गदर्शक झाले, तरी दिल्ली जवळ करताना, त्यांना विरोध करून कसे चालेल? तो त्यांच्या देशगौरवी राष्ट्रसेवेचा अवमान नाही का ठरणार? बरे, दिल्ली जवळ करावयास त्यांच्या साह्यार्थ जावे, तर आपणच जावे, त्याला परकीय, जपानी सैन्य कशाला? याबाबत समक्ष चर्चा घडवून आणावयास देशगौरव सुभाष हिंदुस्थानात आहेत कोठे?

ते शिवछत्रपतींच्या गनिमी काव्याने परतंत्र हिंदुस्थानातून केव्हाच बाहेर पडले होते आणि? कैसरीकंदनाच्या वेळच्या गदर चळवळीच्या धोरणाप्रमाणे इंग्रजी हुकमतीखाली वागलेले भारतीय सैनिक जे जर्मनी-इटलीच्या साह्याने मिळवता आले, ते मिळवून त्यांनी भारताची आझादसेना तयार केली होती. या घटनेवर आधारूनच, जपान हिंदुस्थानच्या जवळ जवळ येऊ लागताच, नेताजींसंबंधी 'चलो दिल्ली' मोर्चाची वार्ता पसरली होती.

तेव्हा, सावधगिरीने राजकीय तोडगा योजावयाचा म्हणून राष्ट्राने आता इंग्रजांना वेळेवर 'चले जाव, भारत छोडो!' चा आदेश द्यावा आणि स्वतंत्र हिंदुस्थानाची बळकट रचना करावयास सुरुवात करावी, असे महात्माजींनी सुचविले. लोकांचा पाठिंबा घेऊन ते करावयास हवे. म्हणून मग, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची तरी बैठक बोलावणे जरूर होते. त्याप्रमाणे ती ७ ऑगस्ट १९४२ रोजी तशी मुंबईस बोलावली. ज्या गवालिया टँकशेजारी गोकुळदास तेजपाल परिसरात हिंदुस्थानची पहिली काँग्रेस भरली, त्याच गवालिया टँकवर 'भारत छोडो'चा ब्रिटिशांना संदेश देण्याकरिता जय्यत योजना झाली.

*

## २६. जनता आपला मार्ग क्रमू लागली

अखिल भारतीय काँग्रेस कमिटी भरली. स्वातंत्र्य-चळवळीचा आढावा आणि प्राप्त परिस्थितीची चिकित्सा करण्यात आली. दोन दिवसांच्या चर्चेनंतर इंग्रजांनी ताबडतोब हिंदुस्थान सोडून जावे, असा आदेश देणारा ठराव मान्य झाला. महात्मा गांधींनी आपला जाहीर संदेश परकीय सत्ताधाऱ्यांना दिला की 'छोडो भारत' पण त्याचबरोबर त्यांनी आपल्या देशबांधवांसही निक्षून सांगितले की, "आपण संपूर्ण स्वतंत्रच आहोत, असे मन बनवा, कामाला लागा आणि नाही तर मरणाला कवटाळा!"

ब्रिटिशांना येथून जावयाला सांगावयाचे म्हणजे दुसऱ्या कोणालाही येथे राज्यकर्ते म्हणून येऊ द्यावयाचे नाही, असा स्पष्ट अर्थ होता. तसे साधावयाचे तर आपल्या देशाचा सारा संसार आपला आपण सावरावयाचा. ते काय इंग्रज वा अन्य कोणीही हुकुमशहा सुखासुखी करून देणार! म्हणून स्वतंत्रपणाची बळकट मनोवृत्ती धरून स्वतंत्र देशाच्या नागरिकाप्रमाणे वागावयाचे आणि त्याच्या आड कोणी आले, तर नुसते "मोडेन पण वाकणार नाही" एवढेच नव्हे, तर "मरेन पण नमणार नाही" या निश्चयाने चालावयाचे, या थराला आलेच पाहिजे. महात्माजींच्या धीरगंभीर पण उत्थापक भाषणाने आखिल भारतीय काँग्रेस कमिटीत, तेथील प्रेक्षकांत आणि मुंबईत चैतन्य आले, असे नव्हे; आखिल हिंदुस्थान नव्या दमाने कार्यान्वित झाला.

'भारत छोडो' हा ठराव मान्य झाल्यापासूनच लोक नव्या चळवळीचा कार्यक्रम, निदान दिशा विचारू लागले होते. महात्माजी दुसऱ्या दिवशी काही कार्यक्रम देण्याच्या विचारात होते, पण त्यांना अवसर परकीय सत्ता देणार तरी कशी? तिच्या पायाखालची वाळू निसटता निसटता, तेथे चर खणावयास लोकांना ती कशी वाव देईल? तिने महात्माजींसह सर्व महत्त्वाचे नेते, मुंबईतीलच नव्हे, तर सगळ्या भारतातले दि. ९ ऑगस्ट रोजी पटापट उचलले आणि कोंबले बंदीखान्यात.

त्यामुळे, नेत्यांवाचून जनता भांबावेल, बुचकळेल आणि कोलमडेल, अशी परकीय सत्तेची अपेक्षा होती. गणित चुकले तिचे. "शिरावाचुनी धड लढवून मुरारबाजी पडला" या इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

"नेत्यावाचुनी चळवळ होऊनी इंग्रज थरथरला" असा अनुभव आला. लोकांनी सरकारी कचेऱ्यांवर मोर्चे नेले, काँग्रेसचे झेंडे लावले, साराबंदी केली, ग्रामराज्ये स्थापली, चोराचिलटांपासून जनतेचे संरक्षण केले, आगगाड्या अडविल्या, खजिने लुटले आणि हिंदुस्थानच्या निदान अकरा जिल्ह्यांत तरी तीन-साडेतीन महिन्यांचे प्रतिसरकारही चालले! आणि हे सर्व ब्रिटिश सरकारच्या मुलकी व लष्करी हुकुमशाहीला आणि गोळीबाराला तोंड देऊन, सैतानी तडाखे सोसून आणि कित्येक संसारांचे स्मशान बनवायला लागले ते आनंदाने बनवून!!!

जनता काही ठिकाणी हिंसाचाराला लागली आणि प्रतिसरकार स्थापण्याच्या प्रयत्नवादींना साह्य करण्याच्या नावाखाली काही गुंडांनी देशभक्तीची वस्त्रे पांघरली, याबद्दल महात्माजी अश्रू गाळीत; पण जनता शूर होत आहे; तिला शूरांची अहिंसा शंभर टक्के पाळता येत नाही म्हणूनच बावळटपणाला अहिंसेचे रूप देऊन न बसता, स्वातंत्र्याची उभारणी रुळलेल्या मार्गांनी ती करीत आहे; असे संमिश्र संवेदन महात्माजींच्या मनाचे चालू असतानाच, त्यांचे दोन जीवनसाथी बंदीवास भोगत असतानाच त्यांना सोडून गेले. महात्माजींची गृहदेवता सौ. कस्तुरबा गांधी आणि "पुत्रवत् पालितो मया।" असे ज्यांच्याबद्दल गांधीजी म्हणत ते त्यांचे "बॉस्वेल" महात्मा गांधींपासून मृत्यूने हिरावून नेले!!

तरीही महात्मा स्थितप्रज्ञ होते. जनतेच्या चळवळीत झालेल्या उद्रेकाबद्दल ब्रिटिश सरकारचे हस्तक भारताची जगभर निंदा करीत होते. त्या जनतेच्या संभाव्य घसरीबद्दल महात्माजी किंवा इतर पुढारी तुरुंगात बसून काय करणार होते? महात्माजींनी परमेश्वराची प्रार्थना केली आणि एकवीस दिवसांचा उपवास करून आपल्या साधुशुचित्वाची हुंडी जागतिक विवेकाच्या पेढीवर पटविली.

*

## २७. ऑगस्ट १५ सन १९४७

हिंदुस्थानात 'भारत छोडो'ची चळवळ चालू असता, अमेरिकेच्या प्रचंड युद्धसाहित्याने रणांगणावर जर्मनी, जपान वगैरे राष्ट्रे मेटाकुटीला आली. १९४५ साली हिटलरी होरपळीचा शेवट झाला. दोस्त राष्ट्रे

विजयी झाली ती अमेरिकन यंत्रसामर्थ्याने. म्हणून ज़र्मनी, जपान प्रभृती राष्ट्रांना पराभवाने मेल्यासारखे झाले, तर अमेरिकन युद्धसामग्रीचे साथी होऊनच आपल्याला विजय मिळाला, तो 'शिखंडीचाच विजय' होय, असे इग्लंज प्रभृतींना होऊन गेले!

मुत्सद्याप्रमाणेच बनियालाही काळाची पावले ओळखता आली पाहिजेत. व्यापारी राष्ट्र असलेले इंग्लंड त्याबाबत कसे घसरेल? जगाच्या बाजारातून उद्या अपमानाने पळण्यापेक्षा मानाने राजकीय सत्ता सोडून आपली तागडी तगडी राखणे इंग्लंडच्या सोयीचे वाटले.

इंग्लंडने तसा निर्णय घेतला, पण स्वभावो दुरतिक्रमः। आपण हिंदुस्थान स्वतंत्र करणार, असे इंग्लंडने जाहीर केले, पण एक मेख मारली. हिंदुस्थानातले सगळे पाचशे-सहाशे संस्थानिक हे तहाने इंग्रजांचे मांडलिक होते तेही आपापलेपरी स्वतंत्र होतील आणि बाकी हिंदुस्थानातील हिंदु-मुसलमान एकत्र नांदण्याचे कबूल करतील तर अखंड हिंदुस्थान राहील; नाही तर मुसलमानांचे पाकिस्तान आणि बाकीचा हिंदुस्थान अशी दोन राष्ट्रे स्वतंत्र होतील.

ही मख्खीची मेख भारतीय पुढाऱ्यांना उमजली नव्हती असे नाही. पण, पाने का कुजतात? घोडा का बुजतो? भाकरी का करपते? या सर्व प्रश्नांचे उत्तर जसे "फिरवली नाही म्हणून!" हे एकच आहे, तसेच परकीय गुलामगिरीमुळे आलेले दोष ती गुलामगिरी टळल्यानेच जातील, या निर्णयावर भारतीय नेते आले. अखंड भारताचे स्वातंत्र्य साकार होत आहे तर ते स्वीकारावयाचेच असे त्यांनी ठरविले.

मिजासखोर संस्थानिक ब्रिटिशांनी शेफारून ठेवले असले तरी त्यांची प्रजा लोकशाहीचीच आकांक्षा बाळगून होती. म्हणून त्यांच्या सामिलीकरणाबद्दल महात्माजींसह सगळ्यांना आत्मविश्वास वाटत होता. पण आपले मुसलमान बांधव? त्यांना आणि त्यांच्या पुढाऱ्यांना महात्माजींनी समजावण्याचा कसोशीने प्रयत्न केला, अखंड भारत राहावा म्हणून!! पण जगात काय वाटेल तेवढा बदल झाला तरी मोंगलशाहीची दिमाखदार रग आणि ब्रिटिशांनी त्यांच्यात पेरलेले सवत्या सुभ्याचे विष इतके भिनलेले आढळले की 'प्रत्येक मुसलमान हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे' असा सिद्धान्त पुढे आला. तो समजण्याची आणि त्यातील स्वैराचार-प्रवृत्तीला

समंज देऊन तिचा समाचार घेणारा 'अवतार' त्या वेळी, नव्हे अजूनही कोठे झाल्याचे आढळात व ऐकिवात नाही. म्हणून रक्तबंबाळ झाल्यासारख्या भावनांनी पाकिस्तान व भारत अशा राष्ट्रांच्या निर्मितीने अखंड हिंदुस्थानची गुलामगिरी जाते आहे आणि लोकशाही स्वातंत्र्य 'समचरण विटेवरी' ठेवू पाहते आहे, म्हणून त्याचे स्वागत झाले.

पण मुसलमानांनाच मोंगलशाहीप्रमाणे सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहिजे, असे मत असणाऱ्यांनी नौखालीत आणि इतरत्र खून-कत्तलींचे बंड माजवले. महात्मा गांधी तेथे आपल्या अनुयायांसह जिवावर उदार होऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी गेले! तोंडी रामनामाचा जप आणि अंतःकरणात मानव्याचे प्रेम होते, पण त्या साधुत्वाला कोणी विचारलेदेखील नाही!! तेव्हा, इंग्लंडहून लष्करी शिस्तीचे लॉर्ड माउंट-बॅटन आले, आणि त्यांच्या दंडुक्याला दंगेखोर दबले.

शांतता प्रस्थापित झाली आणि? दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारत अस्तित्वात आला. तीन-चतुर्थांश हिंदुस्थान का होईना, अखंडपणे स्वतंत्र स्वराज्यशाली झाला एवढ्याच तुटपुंज्या समाधानाने स्वातंत्र्यासाठी संसाराची, जीवनाची आणि आशाआकांक्षाचीही कुर्बानी करणाऱ्या हुतात्म्यांना, देशभक्तांना आणि अज्ञातसहायकांना अभिवादन करून स्वतंत्र भारताचे जीवन सुरू झाले.

*

## २८. हे राम! हे राम!!

भारत स्वतंत्र झाला, त्याच्या आदल्याच दिवशी पाकिस्तान निर्माण झाले होते. तेथले चेंगिझखानी वृत्तीचे लोक सिंधी, पंजाबी, बंगाली हिंदूंना बेबंदपणे छळू लागले. स्वातंत्र्याच्या पवित्र मंदिरात निष्पाप रक्ताची चिळकांडी उडू लागली, मायजातीची विटंबना होऊ लागली, मुलाबाळांचे बळी होऊ लागले. मालमत्ता किती लुटली व नासली गेली याचा पत्ताच नाही!!! भारत-पाकिस्तानाच्या सरहद्दीवरच हे घडले असे नाही; दिवसाढवळ्या दिल्ली व लाहोर, कलकत्ता आणि हैद्राबाद येथेही पानिपते घडली!!!

या हिंसाचाराविरुद्ध महात्माजी कडाडून खवळले. त्यांनी शांतिसिध्यर्थ

उपवास आरंभला. सहकारी मंडळींवर मोठमोठ्या जबाबदाऱ्या सोपविल्या. आपल्या आयुष्याचा क्षण नि क्षण व रक्ताचा कण नि कण शांतीच्या आराधनेत आटविला. निर्वासितांचे लोंढे पाकिस्तानातून लागले होते, त्यांची भारतात सोय झाली. मग रक्तपात थांबला. मुसलमानही भारतात निश्चिंत राहिले. मायजातीला धीर आला.

पण छे! आपल्या तितीक्षेने आणि माणुसकीने शांतता प्रस्थापित करणे महात्मा गांधीना जमले, तरी असंतुष्ट आत्मे थोडेच स्वस्थ बसतात? भारत व पाकिस्तान हे वाटप होताना पाकिस्तानकडून काही येणे होते तसेच पाकिस्तानला दिल्लीने पंचावन्न कोटी रुपये हिशेबाने देणे होते. हा हिशेब दोन्ही बाजूंनी पुरा होणे हा न्याय होता. त्यात दोघाही राष्ट्रांनी कर्तव्यबुद्धीने हिशेबजुळणीस लागावयास हवे होते, पण कर्तव्यनीती न पाहताच पाकिस्तानने आपले पंचावन्न कोटी रुपये भारताकडे मागितले. त्रस्त समंध पुन्हा उठेल तो उठू नये म्हणून, आपली कर्तव्यनीती प्रथम पुढे होऊन भारताने पाळावी, असा सल्ला महात्माजींनी भारताला दिला त्या विश्वपुरुषाच्या नैतिक शब्दाची कदर भारताने केली.

पण त्याने भारतातील एक युवक पिसाळला. 'शठं प्रति शाठ्यम्' ही त्याच्या विचारसरणीतील नीती होती. पाकिस्तानातील समंध शेफारतो गांधीजींच्या अतिरेकी नीतीपालनाने, असे त्याच्या डोक्याने घेतले. सद्गुणांचा अतिरेक हा दुर्गुणच तो मानी, त्यामुळे त्याने असे ठरविले की, ऐनजिनसी महात्माजींनाच गप्प केले की सगळे कसे सुरळित चालेल!

मेंदूच्या पिसाट लहरीत त्याने ३० जानेवारी १९४८ रोजी महात्माजींच्या प्रार्थनासभेत एक मोक्याची जागा हेरून धरली, सायंकाळी पाच वाजून पाच मिनिटे झाली. गांधीजी दिल्ली शहरात बिर्लागृहाच्या आवारात प्रार्थनेसाठी आले आणि? म. गांधीजींच्या छातीवर गोळ्या झाडल्या गेल्या. गोळ्या झाडणारा तो पिसाटलेला तरुणच होता. गोळी छातीवर बसताच, "जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित।।" मानणारा महात्मा "हे राम, हे राम" उद्गारला. महात्माजींचा देह खाली कोसळला आणि भारत देश व सारे त्रिभुवन, आपण एका महात्म्याला मुकलो म्हणून शोकसागरात बुडून गेले!!!

***

# महात्माजींचे प्रबोधन

१. देशावर परकीय आक्रमण झाले तर, ज्यांना हिंसेने रक्षण करावयाचे असेल त्यांनी त्यांनी हिंसेने करावे. सत्कार्यार्थ हिंसा असेल तर परवानगी; परंतु मी अहिंसेनेच प्रतिकार करीन.

२. माझी ध्येये मला माझ्या देहापेक्षाही जवळची आहेत.

३. हातात शस्त्र घेऊन अधःपात थांबवता येत नाही.

४. मी अन्याय सहन करीन मुकाट्याने, तर माझाही अधःपात आणि तुम्हालाही करू देईन, तुमची मनोभावना, सद्भावना, जागृत न करीन तर, तुमचाही अधःपात. अन्याय करणारा नि मुकाट्याने सहन करणारा, दोघे अधःपतित होत असतात. सत्याग्रह दोघांनाही उन्नत करतो– पुन्हा आत्मक्लेशाच्या मार्गाने, म्हणून त्यास सर्वभूतहित बुद्धी आहे.

५. महाभारताचा कर्ता वेदव्यास याच्या अर्थाने मी सनातनी हिंदू आहे! व्यासांनी लक्षावधी श्लोक लिहून सार काय सांगितले? तराजूच्या एका पारड्यात राजसूय यज्ञाचे वजन टाका आणि दुसऱ्यात सत्याचे वजन टाका. सत्याचे पारडे जड आढळेल.

६. मीही समाजवादी आहे. लोकशाही समाजवाद मला हवा आहे. मी मात्र अहिंसक समाजवादी आहे.

७. पूर्वजांनी त्यांच्या काळात पराक्रम केला. त्यांनी स्वतःच्या काळात क्रांती केली, इतिहास निर्मिला. आपण आज आपल्या काळी क्रांती करून पुढे जाऊ या. आपण नवदिव्य इतिहास बनवू या,

घडवू या. पूर्वजांची स्फूर्ती घ्यायची, त्यांचा प्रयत्नवाद घ्यायचा. मिळालेल्या वारशात आपण नवीन मोलाची भर घातली पाहिजे. अशा रीतीनेच संस्कृतीची मशाल अखंड तेवत राहते.

८. समाजात जे पाप होत असते ते, जी अन्याय्य विषमता असते ती नष्ट व्हावी म्हणून प्रत्येकाने स्वतःची शुद्धी करावी.

९. चार प्रकारच्या उणिवा आम्ही नाहीशा करणार, चार प्रकारचे स्वातंत्र्य लोकांना देणार. गरजेपासून मुक्ती, भीतीपासून मुक्ती, धार्मिक स्वातंत्र्य, वाचिक स्वातंत्र्य, आपण भारतीय परंपरा व वृत्ती यांना अनुकूल अशी राज्यपद्धती निर्मू.

१०. स्वराज्यात, रामराज्यात जो धर्म राहील, त्यात परमोच्च धर्म आपण समजतो तेवढाच राहील. आजच्या प्रत्येक धर्मातील संदेश घेऊन तो सत्यधर्म नैतिक व आध्यात्मिक श्रेष्ठता स्थापील.

❊ ❊ ❊



# महात्मा गांधी

| | |
|---|---|
| १८६९ दि. २ ऑक्टो. | पोरबंदर येथे जन्म. |
| १८८७ | मॅट्रिक उत्तीर्ण. |
| १८९१ | इंग्लंडात बॅरिस्टर झाले. |
| १८९३ | मुंबई हायकोर्टाची सनद काढली. |
| १८९६ | दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची दुःखे भारतीय नेत्यांनी समजाविली. |
| १९०४ | 'इंडियन ओपिनिअन' पत्र काढले. |
| १९०६ | झुलू लोकांची सेवा-सुश्रुषा. |
| १९०८ (जुलै) | हिंदुस्थानात लोकमान्यांना हद्दपारी होत असतानाच दक्षिण-आफ्रिकेत भारतीयांचा नाव नोंदणीबद्दल सत्याग्रह |
| १९१४ | दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह विजयी. |
| १९१५ मे २५ | अहमदाबाद येथे सत्याग्रहाश्रम. |
| १९१७ | चंपारण्य सत्याग्रह सेवा. |
| १९१८ | (१) अहमदाबाद गिरणमालक-मजूर तडजोड, (२)खेड जिल्ह्यात साराबंदी. |
| १९१९ | रौलट ॲक्ट निषेध. |
| १९२० | असहकाराची चळवळ सुरू. |
| १९२२ | तीन लेखांबद्दल गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा. |
| १९२८ अखेर | हिंदु-मुस्लिम-एकी, अस्पृश्यता-निवारण |

| | |
|---|---|
| | आणि खादीप्रचार. |
| १९३० | कायदेभंगाची चळवळ. |
| १९३१ | (१) गांधी-आयर्विन करार<br>(२) दुसऱ्या गोलमेज परिषदेस काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी. |
| १९३२ | (१) कायदेभंग-चळवळ<br>(२) डॉ. आंबेडकर समझोता. |
| १९३३ | (१) मंदिरप्रवेश चळवळ.<br>(२) हरिजन साप्ताहिक. |
| १९३४ | राजकारणनिवृत्त. |
| १९४२ | चले जाव चळवळ. |
| १९४५ | नौखालीच्या आगडोंबाळ्यात सेवा. |
| १९४८ ३० जानेवारी | दिल्लीस प्रार्थनासभेत खून होताच 'हरे राम!' म्हणून अनंतात विलीन. |

*

# सत्याग्रही गांधीजी

पु. पां. गोखले

लहानपणापासूनच गांधीजींची सत्य बोलण्यावर, सत्य वागण्यावर निष्ठा होती. त्यांना सर्व धर्मांबद्दल आपुलकी वाटत होती. सर्व धर्म सारखेच पवित्र आहेत अशी त्यांची भावना होती. दुर्गुणांवरही सत्याच्या मार्गाने जय मिळवता येतो अशी त्यांची श्रध्दा होती. त्यासाठी ते जीवनभर लढले. ब्रिटीश सरकार विरुध्द त्यांनी उभारलेल्या सत्याग्रहाच्या लढ्यात संपूर्ण भारत सामिल झाला होता.

आपल्या कर्तृत्वाने, त्यागाने आणि निःस्वार्थ सेवेने ते 'राष्ट्रपिता' झाले.

छपाई विनायक आर्टस